# प्रकरण पाचवे

# उ प सं हा र

...R. BALASAHEB ... LIBRARY

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

भारतीय राजकारणातील एक पक्ष प्रबळ पध्दती हे राजकीय विचारवंतांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. भारतातील एकपक्ष प्रबळ पध्दतीचा विचार भारतातील कॉंग्रेस पक्षाच्यास संदर्भात केला जातो. १९७१ नंतरचा एकपक्ष प्रबळ पध्दतीमध्ये काही बदल घडून आले. १९६९च्या विधानसभा निवडणूकीत कॉंग्रेसला उत्तरेकडील जवळ जवळ आठ राज्यात पराभव पत्करावा लागला. त्यानंतर देशपातळीवर कॉंग्रेस पक्षात फूट पडली. १९६९ नंतर देशी पातळीवर व राज्यपातळीवर कॉंग्रेस संघटनेत गटबाजी निर्माण झाली. यातून पक्ष पध्दतीतील राजकीय प्रक्रियेमध्ये फेरबदल घडून येउ शकतात. भारतातील एकपक्ष प्रबळ पध्दती व कॉंग्रेस अंतर्गत गटबाजी याचा परिणाम राज्यपातळीवरील व जिल्हा पातळीवरील कॉंग्रेस मध्ये झाला.

प्रस्तुत अभ्यासावरून असे निष्कर्ष दृष्टीपथात येतात की कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा आधार हा प्रामुख्याने वैयक्तिक राजकीय महत्त्वाकांक्षा ही आहे. आमच्या अभ्यासातून असे दिसून आले की, गटबाजीवर विचारांचा किंवा धोरणांचा परिणाम आलेला नसतो. त्याच प्रमाणे कोल्हापूर जिल्हयातील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा विकास हा सर्व सामान्यपणे माने आणि कुंभार या गट नेत्यांच्या भोवतीच विकास झाला आहे. या गटांचा विस्तार १९७७ पासून १९८८ पर्यंत वरचेवर वाढतच गेला. म्हणजे या दोन मुख्य गटामध्ये कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणाचे विभाजन झाले आहे.

प्रस्तुत अभ्यासातून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते की जिल्हा-पातळीवरील या गटांचा संबंध राज्यपातळीवरील कॉंग्रेस अंतर्गत गटाशी असतो.

पण हे गट स्थानिक पातळीवर आपले अस्तित्व टिकवून स्वतंत्रपणे काम करतात. तसेच आपल्या हिताच्या आड येणारा पक्ष श्रेष्ठींचा आदेश ते मानत नाहीत. अप्रत्यक्षपणे विरोधकांना सामील होतात. गट- बाजीचा रचना बघितल्यानंतर आणखी एक गोष्ट लक्षात येते की मुख्य गटांच्या पोटात आणखी छोटे छोटे गट तालुका पातळीवर आढळून येतात. या छोटया गटांची संख्या वाढली. परंतु हे गट मुख्य गटाच्या अंतर्गतच काम करत असलेले दिसतात. तसेच विशेषत: गट बदलण्याची त्यांची प्रवृत्ती दिसत नाही.

प्रस्तुत अभ्यासातून आम्हाला गटबाजीच्या विकासाचा खरा आधार हा दोन मार्गाने दिसतो. एक म्हणजे आर्थिक आणि दुसरा सामाजिक. आर्थिक आधारामध्ये कुंभार गटाकडे विशेषत: सहकारी संस्थांचे जाळे आहे. त्यातुन ते आपल्या वरीष्ठ राजकारणासाठी या मार्गाने जनपाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. सहकाराच्या माध्यमातून स्थानिक लोकांना संधी उपलब्ध करुन देऊन स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळवितात. सहकार क्षेत्रातील या मेहरबाणगीद्वारे जिल्ह्याच्या गटबाजीच्या राजकारणात आपले प्रभुत्व ठेवण्याचा प्रयत्न करत असलेले दिसतात. माने यांनी सहकारी क्षेत्रात जास्त आघाडी घेतली नाही. त्यामुळे त्यांचेकडे आर्थिक संस्था कमी असून, स्थानिक स्वराज्य संस्था यातून वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करतात. तसेच या दोन्ही गट नेत्यांनी शैक्षणिक कामातही पूढाकार घेऊन विविध शिक्षण संस्था सुरु केल्या आहेत. त्यातून सामाजिक विकासातून श्रेष्ठत्व मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. पण आमच्या अभ्यासातून असे लक्षात येते की, केवळ स्थानिक स्वराज्य यातील नियंत्रण गटबाजीस आवश्यक नाही तर आर्थिक संस्थाही महत्त्वाच्या आहेत. कारण माने यांचा सहकारी क्षेत्रात वर्चस्व निर्माण करण्याचा चाललेल्या प्रयत्नातून दिसते.

सामाजिक रचनेचा या गटबाजीस आधार आहे. कुंभार यांनी जैन आणि लिंगायत या जातीच्या बहुसंख्य लोकांचा पाठिंबा मिळविला आहे. तर माने यांनी मराठा जातीतील बहुसंख्य लोकांचा पाठिंबा मिळविला आहे. तरीही कुंभार व माने हे दोन गट नेते जातीयवादाचा ठसा उमटवून घेत नाहीत. जिल्हयातील आपल्या गटाला सर्व समावेशक स्वरूप देण्याचा प्रयत्न करत असले तरी दोन्हीही गटामध्ये अल्पसंख्यांकांचे नाममात्र अस्तित्व आहे. आणि दोन्ही गटात विशिष्ठ जातीचा प्रभाव आढळतो. उदा. कुंभार गटामध्ये लिंगायत व जैन व माने गटामध्ये मराठा जातीचा प्रभाव आहे. आपल्या गटाचे वर्चस्व टिकविण्यासाठी हे दोन्ही नेते जाती रचनेवर प्रयत्न करतात. म्हणजेच कोल्हापूर जिल्हयातील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीस जातीय पैलु देखिल आहे.

प्रस्तुत अभ्यासात आणखी एक गोष्ट दिसून येते की हे गट ग्राम-पंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था यांच्या निवडणूकीत भाग घेतात आणि त्या निवडणूकीवेळी ते प्रभाविपणे काम करतात असे दिसून येते. कारण या गटातील लोकांची अशी धारणा आहे की स्थानिक पातळीवर सत्ता केंद्रित केली तर त्यांना यशाचा वाटा सहजा-सहजी मिळतो. विधान सभा, लोकसभा या निवडणूकीवेळी हे गट इतके प्रभावीपणे काम करत नाहीत. तसेच आपला सतत प्रभाव टिकविण्या-साठी हे गट सर्वसामान्यपणे विविध पातळीवर काम करत असलेले दिसतात. राजकीय कामाबरोबरच शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रातही काम करतात. आपल्या शक्ती प्रदर्शनासाठी सभा, संमेलने, मेळावे इ. भरवतात. तसेच कुंभार आणि माने यांनी हातकणंगले आणि शिरोळ या दोन तालुक्यातील शेतकऱ्याच्या संघटना बांधून गट भक्कम करत असलेले दिसतात. त्याच बरोबर कामगार संघटनाही त्यांनी ताब्यात ठेवल्या आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील गटबाजीचे जिल्ह्यावर तीन प्रकारचे परिणाम झाले. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय हे परिणाम झाले. गटबाजीच्या राजकारणास आर्थिक पाठबळ लक्षात घेऊन या दोन्ही गटांनी आर्थिक सहाय्य करणाऱ्या संस्थांचा विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये कुंभार गटाने मोठया प्रमाणात व माने गटाने थोडया प्रमाणात या संस्थांचा विकास केला. त्यामुळे जिल्ह्यात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण झाले आहे. या आर्थिक सहकारी संस्थामुळे कोल्हापूर जिल्हातील शेतकऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारल्याचे दिसून येते. सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या नोकर वर्गाचीही संख्या मोठी असल्याने जिल्ह्यातील बेकारी अल्पप्रमाणात का असेना सोडविण्यासाठी हे गट कारण झाले आहेत. या आर्थिक संस्थातून वैयक्तिक पातळीवर फायदे मिळवून देण्याचा प्रयत्नही या गटांनी केला आहे.

सामाजिक क्षेत्रात सुध्दा विशेषत: अल्पसंख्यांक व दलित लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी या दुलक्षित घटकास जिल्हा राजकारणात आणण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणात का नसेना केला. त्याचप्रमाणे शेतकरी दलित यांना या गटांमध्ये ठिकवून ठेवण्यासाठी त्यांच्यात राजकीय जाणीवा निर्माण केल्या. या फायदयांबरोबरच या गटबाजीचे जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासावर विपरीत परिणामही झाले आहेत. जिल्ह्यात अल्पप्रमाणात मराठा व जैन लिंगायत असा जातीयवाद वाढल्याचे दिसते. आर्थिक बाबतीत या निवडणूकामुळे व गटबाजी टिकव-विण्यास पैशाचा अपव्ययही होत असल्याचे दिसते.

या अभ्यासातून जिल्हा काँग्रेसच्या राजकीय जिवनावरही परिणाम झाल्याचे दिसते. काँग्रेस पक्षाचा विस्तार झाला. तरी काँग्रेस पक्ष एक संघ राहिला नाही. गटबाजीमुळे दोन्ही गट निवडणूक जागा वाटपा-

वेळी आपल्या गटातील लोकांना त्यात संधी मिळावी यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे संपूर्ण जिल्हा हा काँग्रेसच्या प्रभावाखाली असताना देखील लोकसभेच्या निवडणूकीत काँग्रेस उमेद्वारांना परिश्रम घ्यावे लागत असते. तसेच विधानसभेच्या निवडणूकामध्ये काँग्रेसच्या जागा गमवाव्या लागल्या आणि विरोधी पक्षांना त्याचा फायदा मिळाल्याने दिसते. म्हणजेच काँग्रेसच्या राजकीय जिवनातील ही तोटाच आहे.

काँग्रेसच्या जिल्हयातील आर्थिक केंद्रीकरणामुळे आणि या गटबाजी राजकारणामुळे दुसरा कोणताही राष्ट्रीय अथवा प्रादेशिक विरोधी पक्ष प्रबळ झाला नाही. त्यामुळे काँग्रेसवर नियंत्रण आणले जात नाही. हा विरोधी पक्षांचा प्रसंगी कोल्हापूर जिल्हयाचा तोटा झाल्याचे आढळून येते. जिल्हयातील काँग्रेस एक संघ नसल्याने स्वातंत्र्यानंतर अद्यापपर्यंत एकही राज्यपातळीवरील किंवा देश पातळीवरील कॅबिनेट मंत्री झाला नाही. त्यामुळे या जिल्हयाचे सर्वव्यापी नेतृत्व निर्माण होऊ शकले नाही. त्यामुळे राजकीय क्षेत्रात गटबाजीचा प्रतिकूलच परिणाम झाला आहे असे दिसते.

......

# संदर्भ ग्रंथ यादी

## प्राथमिक साधने:


१) जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन कोल्हापूर जिल्हा. १९७६ ते १९८७.

२) कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि. इचलकरंजी. वार्षिक अहवाल १९७७ ते १९८९. — चेअरमन, कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी लि. इचलकरंजी.

३) श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि,गंगानगर इचलकरंजी, वार्षिक अहवाल १९७७ ते १९८९. — चेअरमन, श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.गंगानगर, इचलकरंजी.


## वृत्तपत्रे:


१) दै. केसरी, पुणे
२) दै. किसान, इचलकरंजी
३) दै. लोकसत्ता, मुंबई
४) दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई
५) दै. मँचेस्टर, इचलकरंजी
६) दै. पुढारी, कोल्हापूर
७) दै. सत्यवादी, कोल्हापूर

८) दै. सकाळ, कोल्हापूर
९) दै. समाज, कोल्हापूर
१०) दै. तरुणभारत, पुणे
११) दै. तरुणभारत, बेळगाव
१२) दै. विद्या विलास, कोल्हापूर.

साप्ताहिक:

देवधार किशोर (प्रका.): साप्ताहिक ब्लिटझ, मुंबई.

स्मरणिका आणि विशेषांक:

१) गवळी श्याम (संपा.) : दै. प्रभात दर्शन, सांगली, पंचगंगेच्या काठावरील भगीरथ देशभक्त डॉ. रत्नाप्पा कुंभार, १५ सप्टेंबर १९८९.

२) जगताप रामभाऊ (प्रका): क्रांतीवीर, दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार, अमृत महोत्सव; गौरव गाथा, इचलकरंजी. १५ सप्टेंबर १९८४.

३) जोशी माधव (संपा.): सागर, चिपळून दे.भ. रत्नाप्पा कुंभार गौरव पुरवणी, १५ सप्टेंबर १९८४.

४) कुंभार दुर्ष्यंत (संपा.) : क्रांतीवरी दे.भ. रत्नाप्पा कुंभार "अमृत महोत्सव" गौरव ग्रंथ, १५ सप्टेंबर १९८४.

५) पाटील शंकरराव (प्रका) : बाळासाहेब माने, गौरव ग्रंथ,
५ आक्टोबर १९८६.

६) पाटील शंकरराव (प्रका) : बाळासाहेब माने, गौरव अंग,
२२ आक्टोबर १९८९.

६ अ) पाटील आनंदराव (प्रका) : क्रिडा व सहकार रत्न,१५ सप्टे. १९८५.

७) मुलगेर, श्री.ग.(संपा.) : परिवर्तनाचे प्रवाह: रौप्य महोत्सवी
विशेषांक सकाळ प्रकाशन पुणे,
१९८३.

८) सहकारी महाराष्ट्र विशेषांक मे व जून १९८२, राज्य सहकारी
परिषद अधिवेशन, मुद्रणालय, पुणे.

दुय्यम साधने:

संदर्भ लेखांची सुची:

१) भिडे ग.द. व देशपांडे पु.ल.: कोल्हापूर दर्शन श्री.मदन मोहन
(संपा.) लोहिया अभिनंदन ग्रंथ पुणे, १९७१.

२) भोळे भा.ल. : महाराष्ट्राचे सत्ताधारी नेतृत्त्व:
पाव शतकाचा प्रवास: शिवाजी विद्यापीठ
येथे घेतलेल्या "महाराष्ट्राचे राजकारण
आणि विकास "या चर्चा सत्रात वाचलेला
निबंध, आक्टोबर १९८५.

३) चव्हाण, यशवंतराव : "कॉंग्रेसमधील माझे दिवस" मराठवाडा
(औरंगाबाद), दिवाळी अंक १९८६.

४) देशमुख,एम्.ए. : "महाराष्ट्रातील शेती पाणी पुरवठा सोसायटयांचा दुबळेपणा" सहकारी जगत, पुणे, १९८९.

५) फडके, य.दि. : "महाराष्ट्र आणि कॉंग्रेस" मराठवाडा (औरंगाबाद) दिवाळी अंक १९८४.

६) गरुड, शांताराम : सहकार आणि समाजवाद, चर्चासत्र समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १९८८.

७) सावंत, डी.ए. : सहकारी सोसायटयांची आंतरव्यवस्था राज्य सहकारी विशेषांक मे, १९८२.

८) पाटील, ज.फा. व जुगळे, वसंत : महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा क्षेत्रिय व विभागीय असमतोल, सहकारी प्रबोधन, १९८९.

९) पाटील, सा.रे. : १९८९ मधील दत्त सहकारी साखर कारखाना, शिरोळ, निवडणूक प्रचार भाषण, नृसिंहवाडी, १० मे १९८९.

१०) माने, बाळासाहेब : भारत एज्यूकेशन सोसायटी, रुकडी ३ सप्टेंबर १९८७ चे भाषण.

५



## संदर्भ ग्रंथांची यादी - मराठी:

१) बागल् माधवराव : सामाजिक विचार मंथन, आनंद प्रकाशन औरंगाबाद, १९८१.

१-अ) ब्रास पॉल : फॅन्शालन पॉलिटिक्स इन इंडियन स्टेट.

२) भोळे, भा.ल. : यशवंतराव चव्हाण-राजकारण आणि साहित्य आवृत्ती पहिली, संकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५.

३) चौधरी, प्र.डो. : सहकारी तत्त्वे, इतिहास व सहकारी सोसायट्यांची कार्यपध्दती, लेखक ५ कन्नमवार विक्रोळी (पूर्व) मुंबई १९७८.

४) दास्ताने, संतोष (संपा.): महाराष्ट्र १९८५, आ.पहिली, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८५.

५) फडके, य.दि. : शाहू छत्रपती आणि लोकमान्य श्री.विद्या प्रकाशन, पुणे, १९८६.

६) काळे, आर.जी. : सहकारी जगत, पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिक सहकारी मंडळ मर्यादित, सहकारी मुद्रणालय पुणे, मे-जून, १९८५.

७) काळे, भगवान (संपा.) : महाराष्ट्र काल आणि आज, जालना, १९८८.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

८) कामत, अ.रा. : भारतातील सामाजिक बदल - मागोवा, पुणे, १९८३.

९) कीर, धनंजय : शाहु,छत्रपती, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९७६.

१०) लट्ठे, आ.बा. : छ.शाहू महाराजांचे जीवन चरित्र, १९२५.

११) मंगुडकर,मा.प.(संपा.) : महाराष्ट्राचे राजकारण चर्चासत्र, पुणे विद्यापीठ, पुणे १९६७-६८.

१२) नेहरु पंडीत जवाहरलाल : भारतीय सहकार, काँग्रेसचे चौथे अधिवेशन, उद्घाटनपर भाषण, १९६३.

१३) पन्नालाल सुराजा व किहाळकिशोर (संपा) : आजचा महाराष्ट्र १९४७-८७, या काळातील महाराष्ट्रातील आर्थिक जडण घडण, श्री.विद्या प्रकाशन, पुणे, १९८८.

१४) सरदार,गं.बा.(संपा.) : महाराष्ट्र जीवन: परंपरा प्रगती आणि समस्या (खंड पहिला) आ.पहिली, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९७२.

१५) सहकार आयुक्त व निबंधक : महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे प्रकाशित, १९८८.

१६) क्षिरसागर, पा.टा. : सहकारी समित्यांचे अहवाल, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, १९७३.

१७) तळेकर, विक्रमसिंह : करवीर नगरी विनिविक्रम प्रकाशन, कोल्हापूर, १९७४.

१८) उपाध्ये, व्ही.आ. : कोल्हापूर जिल्हयातील सहकारी चळवळ शेतकरी सहकारी संघाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित एम्. फिल्. शोधनिबंध), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१९) येडेकर, शाम : राजश्री शाहू एक व्यक्ती दर्शन, कोल्हापूर, १९७१.

.....